# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २९ // विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ११/०२/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**११/०२/२०२० मंगळवार** रोजी दुपारी ०३.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. ढेकळे सदाशिव गणपत | श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ |
| श्री.पोकळे दिलीप बबनराव | श्री. पाटील राजेंद्र झिपरु |
| श्री. खडके सुनिल वामनराव | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री.सनकत चेतन गणेश | सौ. काळे रेश्मा कुंदन |

सदर सभेस मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी, डॉ.श्री. अविनाश ढाकणे, उपायुक्त. श्री. अजित मुठे, मा.उपायुक्त, श्री.मिनीनाथ दंडवते, मा. सहा.संचालक नगररचना.श्री.सु.आ.पवार, मुख्यलेखापरिक्षक .श्री. संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी . श्री.कपिल पवार, शहर अभियंता श्री.सुनिल भोळे , सहा.आयुक्त. पवन पाटील व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्य. श्री. मुकुंदा भागवत सोनवणे यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा.सभापती यांनी मंजुर केला आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./ जशमनपा/ लेखा /८२३/२०१९-२०२० दि.०४/०२/२०२० अन्वये मा.आयुक्त यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

- मा. आयुक्त यांनी मा.सभापती , स्थायी समिती यांना फुलगुच्छ देवुन अंदाजपत्रकाची प्रत दिली व सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्यांना अंदाजपत्रकाच्या प्रती देण्यात आल्या.

**मा. आयुक्त तथा जिल्हाधिकारी :-** मा.स्थायी समिती सभापती व सन्माननीय सदस्य , महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये मी जळगांव शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणुन सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

सन २०१९-२० च्या सुधारीत अर्थसंकल्प तयार करतांना उत्पन्नाचा विचार करुन कोणतीही वाढ न करता उत्पन्न खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०२०-२१ चा अर्थ- संकल्प रु. १२८.८२ कोटी आंरभीच्या शिल्लकेसह सुरुवात आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा अर्थ संकल्प शिल्लक रु.१२८.८२ कोटी महानगरपालिका उत्पन्न रु.५८२.२६ कोटी व अनुदाने रु.९१.८२ असा एकुण रक्कम रु.६७४.८ कोटी इतका प्रस्तावित आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वार्षाच्या मुळ अंदाज अर्थसंकल्पात दैनीक बाजार शुल्का मध्ये पुर्वीचे रु.२० या प्रमाणे प्रती हॉकर्स यात रु.३० एवढी वाढ करुन रु.५० प्रती हॉकर्स प्रमाणे वसुल करावयाचे प्रस्तावीत आहे. तसेच मनपा निधी रु.९०.६१ कोटी व शासकीय निधी रु.३७७.२७ कोटी मिळुन एकुण अंदाजपत्रक रु. ११४१.९६ कोटी इतके प्रस्तावीत आहे.

शहरवासियांना किमान नागरीसुविधा उपलब्ध करुन देणे मोठे आव्हान असुन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देवुन ते पुर्ण करावे लागणार आहे. सन २०१९-२० मध्ये महसुलाच्या वसुलीत वाढ करुन कमीत कमी दायीत्व पुढील वर्षात हस्तांतरीत केल्याने सन २०२०-२१ मध्ये नविन मुलभुत नागरी सुविधांच्या कामांसाठी तरतुद करणे शक्य झालेले आहे.

सन २०१९-२० चा सुधारीत अर्थ संकल्प तयार करतांना संपुर्ण विभागांचा कामानिहाय आढावा प्रलंबीत दायीत्व याचा सविस्तर विचार करण्यात आलेला असुन त्यानुसार पुढील वर्षात नविन कामासांठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. शहराच्या सुनियोजीत विकासाबाबत मी कटीबध्द आहे.

**सन २०२०-२१ चे मुळ अर्थ संकल्पीय अंदाज**

(रक्कम कोटीत)

| अ.नं. | उत्पन्नांचा तपशील | सन २०२०-२१ चे मुळ अंदाज | | अ.नं | खर्चाचा तपशील | सन २०२०-२१ चे मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | म.न.पा. उत्पन्न | ४५३.४४ | | १ | महसुली खर्च | ३५४.४७ |
| २ | अनुदाने | ९१.८२ | | २ | भांडवली खर्च | १५०.८६ |
| ३ | मनपा निधी | ९०.६१ | | ३ | म.न.पा निधी खर्च | ९०.६१ |
| ४ | शासकिय निधी | ३७७.२७ | | ४ | शासकिय निधी खर्च | ३७७.२७ |
| ५ | आरंभिची शिल्लक | १२८.८२ | | ५ | अखेर शिल्लक | १६८.७५ |
| | एकुण | ११४१.९६ | | | एकुण | ११४१.९६ |

जळगांव शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुर्वगामी धोरणात्मक निर्णय घेवुन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणी माझ्या सहकारी अधिकाऱ्यांना प्रोत्साहीत करीत असलेले मा. महापौर,मा.उपमहापौर व मा. सभापती स्थायी समिति , मा.सभापती महिला व बालकल्यान समिति , मा.सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा. गटनेते, सर्व सन्मा. नगरसेवक व सर्व पक्षांचे लोकप्रतिनीधी यांचे मन:पुर्वक आभार व्यक्त करतो.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभाग असलेले महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.अजित मुठे , उपायुक्त श्री.उत्कर्ष गुटे, उपायुक्त श्री. मिनीनाथ दंडवते, मुख्य लेखा परीक्षक श्री. संतोष वाहुळे, मुख्य लेखाधिकारी श्री. कपील पवार, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थ संकल्प अहोरात्र तयार केल्याबद्दल लेखाविभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करतो.

या पार्श्वभुमिवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाव्दारे प्रस्तावीत केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मुर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर जळगांव महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतीमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगुन या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज महासभेस शिफारस करण्यासाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

**श्री.दिलीप पोकळे:-** अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदरची सभा तहकुब करण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे:-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३० पारित करण्यात आला.**

आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./ जशमनपा/ लेखा /८२३/२०१९-२०२० दि.०४/०२/२०२० अन्वये आयुक्त यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

असा ठराव करणेंत येत आहे की, आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/८२३/२०१९-२०२० दि.०४/०२/२०२० अन्वये आयुक्त यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०१९-२०२० चे सुधारीत व सन २०२०-२०२१ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण व निवेदन स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदर सभा तहकुब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०९ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिति**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**